## प्रेस नोट

स्थानिक गुन्हे शाखा,गडचिरोली दिनांक २९.०६.२०२०

| पो.स्टे /अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| देसाईगंज - अप.क्र. १९७/२०२० कलम ६५(अ),९८(क),८३ महा.दारुबंदी अधि. | मौजा कोरेगाव १३ किमी उत्तर **घटना ता. वेळ** :- दि.२७/०६/२०२० चे ०७:३० ते ०८:४० वा.पर्यंत | फिर्यादी सरकारतर्फे सफौ/७८७ दादाजी एम करकाडे नेम. स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय,गडचिरोली<br>आरोपी नामे १) **मिलींद भोजराज कांबळी** वय २४ वर्षे रा. इटखेडा (ईसापुर) ता. अर्जुनी जि. गोंदिया<br>२) भास्कर सदाशिव वैद्य वय ४७ वर्षे<br>३) माणिक प्रेमदास रामटेके वय ४८ वर्षे दोन्ही रा. कोरेगाव ता. देसाईगंज जि. गडचिरोली<br>**पाहिजे आरोपी** - १) सुशिल कोडापे वय ३५ वर्षे रा. इटखेडा (ईसापुर) ता. अर्जुनी जि. गोंदिया<br>२) दानु साखरे वय ४२ वर्षे रा. मांडवखालटोला ता. अर्जुनी जि. गोंदिया<br>३) रुपेश मडावी वय २४ वर्षे रा. ता. अर्जुनी जि. गोंदिया<br>४) आकाश वैद्य वय २२ वर्षे रा. इटखेडा (ईसापुर) ता. अर्जुनी जि. गोंदिया<br>५) शैलेश लांडगे वय ४० वर्षे रा. इटखेडा (ईसापुर) ता. अर्जुनी जि. गोंदिया |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैध दारु मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती वरुन | **स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली** - पोउपनि. भागवत कदम ,सफौ/७८७ दादाजी करकाडे, पोशि/५३५४ सुनिल पुड्डावार, पोशि/३४६७ मंगेश राऊत, चापोशि/२११३ सिध्देश्वर बाबर<br>**पोस्टे देसाईगंज** - सपोनि. रुपाली बावनकर , सफौ/१०५६ अशोक कराडे, नापोशि/७९६ प्रेमकुमार भगत. | |

गडचिरोली जिल्हयातील अवैध दारुविक्री तसेच बेकायदेशीर दारु वाहतुकीस आळा बसावा याकरीता मा.श्री.शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी जिल्हयातील अवैध दारु–जुगार व ईतर अवैध व्यवसायांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशीर कार्यवाही करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक २७/०६/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे मा. पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी सा. गडचिरोली यांचे आदेशाने पोलीस पथक दारु रेड कामी मौजा देसाईगंज परिसरात गस्त करीत असतांना येथील वरील नमुद ठोक दारु विक्रेते हे अवैध देशी दारु पुरवठा करणार आहेत अशा खबरेकरुन मा.डॉ.मोहीत कुमार गर्ग अपर पोलीस

अधिक्षक(प्रशासन)यांना माहीती देवुन त्यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडील वरील नमुद पोलीस पथक हे पोस्टे देसाईगंज येथे पोहचुन प्रभारी अधिकारी सपोनि रुपाली बावनकर, यांना माहिती देऊन त्यांचे सह अवैध दारु रेड कारवाई करीता दोन स्थानिक पंचांना सोबत घेवुन मिळालेल्या माहीतीचे आधारे कोरेगाव परीसरात शोध घेत कोरेगाव येथील दारु विक्रेता भास्कर वैद्य याचे घराकडे जात असतांना त्यांचे घरासमोर एक पांढरे चारचाकी वाहन रजिस्ट्रेशन क्रमांक एम.एच.३१-सीएम-४०६९ थांबवुन त्यामधील अवैध देशी दारु उतरवितांना चार इसम दिसले. आम्ही व पोस्टाफ आपआपले अस्तीत्व लपवुन त्यांचेजवळ गेलो असता एक इसम मिळुन आला. व त्याचे सोबतचे तीन इसम हे दुचाकी वाहनाने पळुन गेले. त्यांचा पाठलाग केला असता ते मिळुन आले नाही. मिळुन आलेल्या इसमाचे नाव, गाव विचारले असता त्याने आपले नाव मिलींद भोजराज कांबळी वय २४ वर्षे रा. इटखेडा (इसापुर) ता. अर्जुनी जि. गोंदिया असे सांगितले. त्यास मालाबाबत विचारणा केली असता सुशील कोडापे रा. इटखेडा (इसापुर) ता. अर्जुनी जि. गोंदिया यांचे सांगणेवरुन मौजा मांडवखालटोला ता. अर्जुनी जि. गोंदिया येथील दानु साखरे याचे दारुचे दुकानातुन माल घेऊन भास्कर वैद्य व माणिक रामटेके दोन्ही रा. कोरेगाव ता. देसाईगंज जि. गडचिरोली यांना एकुण १६ पेट्या दिल्या असुन चारचाकी वाहनात ९ पेटया शिल्लक आहेत. पंचासमक्ष चारचाकी वाहनाची पाहणी केली असता त्यात ९ देशी दारुच्या पेटया मिळुन आल्या. तसेच पळुन गेलेल्या इसमांबाबत विचारपुस केली असता त्याने त्यांची नावे अनुक्रमे १) रुपेश मडावी वय २४ वर्षे रा. ता. अर्जुनी जि. गोंदिया २) आकाश वैद्य वय २२ वर्षे रा. इटखेडा (ईसापुर) ता. अर्जुनी जि. गोंदिया ३) शैलेश लांडगे वय ४० वर्षे रा. इटखेडा (ईसापुर) ता. अर्जुनी जि. गोंदिया असे सांगितले. त्यानंतर कोरेगाव येथील चिल्लर दारु विक्रेता भास्कर वैद्य व माणिक रामटेके याचे घरांची पंचासमक्ष घरझडती घेतली असता त्यांचे राहते घरी अनुक्रमे १२ व ४ देशी दारुच्या पेटया मिळुन आल्या. असा एकुण खालील वर्णनाचा व किंमतीचा अवैध मुद्देमाल मिळुन आला तो खालीलप्रमाणे. १) किंमत २,००,०००/- रुपये टायगर ब्रँड देशी दारु संत्री कंपनीच्या ९० मिली मापाच्या एकुण २५ पेटया अवैध विक्री किंमत प्रमाणे.२) किंमत ३,००,०००/- अवैध दारु वाहतुकीकरीता वापरलेली एक पांढ-या रंगाची रजिस्ट्रेशन क्रमांक एम.एच.३१ सीएम-४०६९ असलेली चारचाकी वाहन असा आहे. असा **एकुण ५,००,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल** घटनास्थळावरुन जप्ती करुन ताब्यात घेवुन गुन्हयातील आरोपीतांविरुध्द पोलीस स्टेशन देसाईगंज येथे वरील नमुद कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सध्या संपुर्ण देशात कोवीड-१९ या साथीच्या रोगाची आपत्तीजनक परीस्थीती निर्माण झालेली असुन महाराष्ट्र राज्यात लॉकडाऊन असल्याने सदरचे कालावधीत अवैध दारुविक्री व बेकायदेशीर दारु वाहतुक होणार नाही. याकरीता स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक अहोरात्रो अवैध दारु रेड मोहीम राबवुन प्रभावीपणे कारवाई केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथक व पोलीस स्टेशन देसाईगंज यांचे संयुक्तपणे होत असलेल्या प्रभावी कारवाई मुळे अवैध दारुविक्री करणारे तसेच बेकायदेशीररित्या दारुची वाहतुक करणाऱ्या लोकांचे धाबे दणानले आहे.

